# वसई विरार शहर महानगरपालिका
# वैद्यकीय आरोग्य विभाग, मुख्यालय

जा.क्र. :- ववशिम/वैआवि/२५६४/२१-२२
दिनांक :- ११/०१/२०२२

## "जाहिर दरपत्रक"

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामध्ये खाली उल्लेख केल्याप्रमाणे काम करावयाचे असून सदर काम करण्यास इच्छुक एजन्सी यांनी त्यांच्या लेटरपॅडवर खालील उल्लेख केलेल्या कामांच्या बाबींचे दर (सर्व करासहीत) दि.१९/०१/२०२२ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत बंद पाकिटातून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, वैद्यकीय आरोग्य विभाग, विरार (पूर्व) यांचेकडील आवक बारनिशीकडे सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशिल | परिमाण | दर (रुपये) | |
|---|---|---|---|---|
| | | | अंकात | अक्षरात |
| १ | सन २०११ पासून आर.सी.एच. कर्मचारी, ६ महिन्यांच्या करार पध्दतीने घेण्यात आलेले पॅरामेडीकल कर्मचारी, ए.एन.एम., फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक, क्ष-किरण सहाय्यक, शितसाखळी तंत्रज्ञ इत्यादी कर्मचाऱ्यांचे वेतन/मानधन यामधील ईपीएफ विहीत वेळेत शासनाकडे भरणा करणेकामी ई चलन बनवून देणे. (हार्डकॉपी व सॉफ्टकॉपी)<br>कर्मचाऱ्यांना आवश्यक असेल त्या वेळेस व उपयुक्ततेप्रमाणे त्यांच्या ईपीएफ खात्यातून रक्कम सदर कर्मचाऱ्यांच्या खाती जमा करणे व त्याचा अहवाल महानगरपालिकेस वेळोवेळी सादर करणे. | वार्षिक | | |

-: अटी-शर्ती :-

१) दरपत्रकधारकाने स्वतःचे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. सदर कामाबाबतचे अनुभवाचे दाखले जोडणे आवश्यक असणे बंधनकारक राहील.

२) दरपत्रकधारकाचे / संस्थेचे पॅन कार्ड आवश्यक.

३) उपरोक्त दरपत्रके मुदतीमध्ये व वेळेमध्ये मुख्य कार्यालय, वैद्यकीय आरोग्य विभागातील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.

४) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून ७ दिवसांत करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

५) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. उप-आयुक्त, वैद्यकीय आरोग्य यांना राहिल.

६) वरील अटींचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणीअंती अपात्र ठरविण्यात येईल.

७) यासंबंधीची दरपत्रके स्वतःचे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दि. १९/०१/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.

८) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.१९/०१/२०२२ रोजी सायं.४.०० वाजता मा. उप-आयुक्त, वैद्यकीय आरोग्य यांचे दालनात दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित असल्यास अथवा नसल्याससुध्दा दरपत्रक उघडण्यात येतील.

दिनांक :- ११/०१/2022

ठिकाण :- वसई विरार शहर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय, विरार

उप-आयुक्त (वैद्यकीय आरोग्य)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका * ता. वसई, जि. पालघर *